दै. जागवरी दि. 22.05.25

# १८ लाख ७२ हजाराचे १३२ मिसिंग मोबाईल सापडले

## आय एम ई आय क्रमांक ओळखून सायबर शाखेतून मोबाईल घेऊन जा – अविनाश कुमार

**नांदेड/प्रतिनिधी**



जिल्ह्यातील सार्वजनिक ठिकाणाहून तसेच सोमवार मंगळवार, बुधवार, गुरुवार, शुक्रवार, शनिवार, व रविवार या दिवशी बाजारातून गहाळ झालेले १३२ महागडे मोबाईल स्थानिक गुन्हे शाखा व सर्व पोलीस ठाण्याचे पथक यांनी हस्तगत केले आहेत. ज्यांचे मोबाईल गहाळ झाले असतील त्यांनी मोबाईलचा आय एम इ आय क्रमांक ओळखून सायबर शाखेतून घेऊन जावेत, असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी केले आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षकांनी सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांना जिल्ह्यातील सार्वजनिक ठिकाणाहून व आठवडी बाजारातून गहाळ झालेल्या महागड्या मोबाईलचा शोध घेण्याकरिता आदेशित केले होते. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्याचे पथक व स्थानिक गुन्हे शाखा तसेच सायबर सेल यांनी एक शोध मोहीम राबवली. या पथकांनी जिल्ह्यातील गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन घेऊन एकूण १३२ मोबाईल (किंमत १८ लाख ७२ हजार रुपये) चा शोध लावला. त्यांचे एकत्रित रित्या २१ मे रोजी पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. शोध लागलेल्या मोबाईलचे आयएमइआय क्रमांकाची माहिती नांदेड पोलीस दलाचे 'नांदेड पोलीस' या फेसबुक पेजवर व ट्विटर वर टाकण्यात आले आहे. नागरिकांनी त्यांच्या हरवलेल्या मोबाईलचा आयएमइआय क्रमांक ओळखून सायबर पोलीस ठाणे इथून मोबाईल घेऊन जावे, असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी केले आहे. ही कामगिरी सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक एम. बी. चव्हाण, पोलीस अंमलदार राजेंद्र सिटीकर, दीपक ओढणे, डावीद पिडगे, किशोर जैस्वाल, काशिनाथ कारखेडे, दीपक शेवाळे, ज्ञानेश्वर यन्नावार, दीपक राठोड, महिला पोलीस कांचन कसबे, शुभांगी जाधव, रेश्मा पठाण व व्यंकटेश सांगळे यांनी केल्याबद्दल त्यांचे पोलीस अधीक्षकांनी कौतुक केले आहे.